## ॲडमिशन अपडेट

# 'जेईई मेन'मधून प्रवेशाच्या अनेक संधी उपलब्ध

अभियांत्रिकी प्रवेशासाठी देशपातळीवर 'सीबीएसई' बोर्डातर्फे घेतल्या जाणाऱ्या 'जेईई- मेन'मधून एनआयटी, आयआयआयटी यासह देशातील अनेक नामांकित संस्थांमधील प्रवेशाच्या संधी उपलब्ध होतात. या संस्थांमध्ये प्रवेशासाठी स्वतंत्र परीक्षा न घेता 'जेईई- मेन'मधून प्रवेश देण्यात येत असले तरीही प्रत्येक संस्थेमध्ये स्वतंत्रपणे अर्ज करावा लागतो.

'जेईई- मेन २०१७' परीक्षेमध्ये प्राप्त होणाऱ्या मेरीट क्रमांकानुसार नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमधील प्रवेश दिले जातील. देशभरातील प्रथम क्रमांकाच्या प्रतिष्ठित अशा आयआयटीच्या २२ संस्थांमधील सुमारे १० हजार ६०० जागांवरील प्रवेशासाठी 'जेईई- मेन'मधून २ लाख ३० हजार विद्यार्थ्यांना 'जेईई- ॲडव्हान्स'साठी संधी देऊन त्यामधून आयआयटीचे प्रवेश होतील.

खालील नामांकित संस्थांमध्ये प्रवेशासाठी स्वतंत्रपणे परीक्षा न घेता 'जेईई- मेन'मधील ऑल इंडिया रँकच्या आधारे प्रवेश दिले जातात. अर्थातच अशा संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी प्रत्येक संस्थेच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावा लागतो. सर्वसाधारणपणे एप्रिलपासून अर्ज उपलब्ध होतात. प्राप्त झालेल्या अर्जांमधून गुणानुक्रमांकाद्वारे निवड करून समुपदेशन पद्धतीने प्रवेश दिले जातात. सर्व संस्थांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय आहे.

दिले जातात. सर्व संस्थांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय आहे.

**आय.आय.एस.टी.** : भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ स्पेस अंतर्गत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी या संस्थेत चार वर्षांच्या कालावधीमध्ये बी.टेक. पदवी अभ्यासक्रमाची सोय आहे. अवकाश विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रात उपग्रह व सॅटेलाइट लॉंचिंग व्हेइकल क्षेत्रात 'इस्रो'सह फक्त पदवीनंतरच शास्त्रज्ञ, अभियंतापदावर करिअरची संधी प्राप्त होते. फक्त १४० जागा, त्यामुळे प्रवेश मिळविणे अत्यंत कठीण असते. या प्रवेशासाठी 'जेईई- मेन'मध्ये चार हजारांपेक्षा उच्च रँक मिळवावी लागते.

**आय.सी.टी. मुंबई** : या संस्थेमधील बी.टेक. इंजिनिअरिंग व बी. केमिकल इंजिनिअरिंगमधील सात वेगवेगळ्या शाखांमधील उपलब्ध असलेल्या जागांच्या ३० टक्के प्रवेश हे 'जेईई- मेन'मधून प्राप्त होणाऱ्या ऑल इंडिया रँकनुसार देण्यात येतात. उर्वरित ७० टक्के प्रवेश राज्याच्या अभियांत्रिकी प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या 'सीईटी'मधून दिले जातात. रंगसामग्री तंत्रज्ञान, धागे व वस्त्रनिर्माण प्रक्रिया तंत्रज्ञान, अन्न अभियांत्रिकी तंत्रज्ञान, तैल रसायन पृष्ठक्रियाकर्मी तंत्रज्ञान, औषधनिर्माण तंत्रज्ञान, पॉलिमर इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी अशा वेगवेगळ्या ठिकाणी बी.टेक. पदवी घेता येते.

**आय.आय.एस.ई.आर.** : भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेच्या भोपाळ, कोलकता, मोहाली, पुणे, तिरुअनंतपुरम व तिरुपती या शाखांमध्ये प्रत्येक संस्थेमधील एकूण प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागांवरील प्रवेश हे 'जेईई- मेन'मधील रँकनुसार होतात. मूलभूत विज्ञानात आवड असणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांना या संस्थांमधून शास्त्रज्ञ बनण्याची संधी आहे.

'जेईई- मेन' परीक्षा २ एप्रिल २०१७ रोजी झाल्यानंतर आपल्या गुणांचा अंदाज घ्यावा व त्यानंतर वरील संस्थांमध्ये अर्ज करावा.

**हेमचंद्र शिंदे**, बारामती
(शब्दांकन : **ज्ञानेश्वर रायते**, बारामती)